<u>आर.सी.सी.क्र.११८/२०२५</u> <u>निशाणी क्र.११</u>

सरकार वि. योगेश वाघमारे व इतर–१

## दोषारोप

मी डी.आर.कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.३ शेवगांव याव्दारे दोषारोप ठेवतो की, तुम्ही आरोपी –

**१. योगश आसाराम वाघमारे,**
वय –४० वर्षे, धंदा– शेती,

**२. मुक्ता योगेश वाघमारे,**
वय –३५ वर्षे, धंदा– शेती,
दोघे रा. गायकवाड जळगाव,
ता. शेवगाव, जि.अहमदनगर

खालीलप्रमाणे,

०१. दिनांक ०१.०६.२०२४ रोजी, सकाळी ११:०० वाजताचे सुमारास, तुम्ही आरोपींनी संगनमताने मौजे गायकवाड जळगाव येथे फिर्यादीचे घराशेजारी असलेल्या शेतात, ता. शेवगाव येथे फिर्यादी बेबी बुळे हिस लाकडी काठीने डोक्यात ज्याचा शस्त्र म्हणून वापर केल्यास जीव जावू शकतो, मारून दुखापत केली व त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम **३२४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला.

०२. तसेच वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व त्याव्दारे भारतीय दंड संहिता कलम **३२३ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला.

०३. तसेच वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारास कायदा हातात घ्यावा व गैरकृत्य करावे या उद्धेशाने शिवीगाळ करुन प्रक्षोभित केले आणि तुम्ही भारतीय दंड संहिता कलम **५०४ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला.

०४. तसेच वर नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने फिर्यादीस व साक्षीदारास जीवानिशी मारण्याची धमकी दिली व त्यांच्या मनात भय उत्पन्न

केले आणि तुम्ही आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम **५०६ सह कलम ३४** अन्वये गुन्हा केला.

sd/-

ठिकाणः शेवगांव ( डी.आर.कुलकर्णी )

दिनांक २५.०६.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.३, शेवगांव.

**– प्र मा ण प त्र –**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना वरील दोषारोप मराठी भाषेमध्ये समजावून सांगितला, तो त्यांना समजला व त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले.

sd/-

ठिकाणः शेवगांव ( डी.आर.कुलकर्णी )

दिनांक २५.०६.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.३, शेवगांव.